नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०९/०७/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत १९ कि.मी. अंतरावरील मौजा कलमुंडा येथे दिनांक ०८/०७/२०२२ चे ०१.०० वा. ते ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रकाश धनराजाची रोकडे, वय ३९ वर्ष रा. कलमुंडा तालुका काटोल जिल्हा नागपूर यांच्या घरासमोरील बांधलेल्या खुल्या जागेत असलेले ३ गायी असा एकुण कि. ८,५००/– रु. चे चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुनील बन्सोड मो.नं. ९७६४०९०२०८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा पिपळा शिवार येथे दिनांक ०६/०७/२०२२ चे १८.०० वा. ते दिनांक ०७/०७/२०२२ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– मनोज मोरेश्वर शेळकी, वय ३० वर्ष, रा. पिपळा ता.पारशिवनी यांनी ठेक्याने केलेल्या शेतीमधील विहीरीत पाण्याची मोटर (पाणबुडी) लावली असता आरोपी नामे– १) शेषराव पुसाराम गोंडाळें वय ३४ वर्षे, २) शिशुपाल उर्फ भुऱ्या धनराज मेश्राम वय २३ वर्षे, ३) नथ्थु बाळकृष्ण शिवारे वय ३१ वर्षे, ४) बंटी बबन मेश्राम वय २७ वर्षे, सर्व रा. पिपळा यांनी सी.आर. आय. कंपनीची ५ हॉर्सपावर पाण्याची मोटर कि. १०,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभाकर झोड मो.क्र. ८२०८९४३८७४ हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा खैरी शिवार खैरी नाला येथे दिनांक ०८/० ७/२०२२ चे ०८.२८ वा. दरम्यान एमएच– ४०/एल– ५७४७ क्रमांकाचा ट्रॅक्टर व एमएच– ४०/एल– ५७४७ क्रमांकाचा ट्रॉलीचा चालक आरोपी क्र. १ नंदकिशोर पंजाबराव कोडवते, वय २९ वर्ष, रा. उमरी जामळापाणी याने त्याचा गाडी मालक आरोपी क्र. २. आशिष निळे, वय ३५ वर्ष, रा. खापा नविन वस्ती याचे सांगण्यावरून त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर व ट्रॉलीमध्ये अवैधरित्या नाल्यातील रेती चोरीने भरून वाहतुक करीत असतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन एमएच– ४०/एल– ५७४७ क्रमांकाचा ट्रॅक्टर व एमएच– ४०/एल– ५७४७ क्रमांकाचा ट्रॉली किमती ४,००,०००/–रू. व एक ब्रास रेती किमती ४,०००/–रू. असा एकुण कि. ४,०४,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई गणेश भगनुरे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री कलेगुरवार मो.क्र. ९१७५५७९१४३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर